।। संहतिः कार्य साधिका ।।

# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ


सार्वजनिक नोंदणी क्र. एफ३९७६

लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई ४०० ०१६.

दूरभाष : २४३० २२७३, २४३० ७५७३, Email : aadrbm@gmail.com, Web Site : www.adrbm


## मध्यवर्ती मंडळाच्या "अध्यक्ष", "कार्यकारी मंडळ" त्रैवार्षिक निवडणूकीची सूचना

दि. ६ जून २०२४

माननीय सभासद,

सादर नमस्कार,

सर्व सभासदांना सूचना देण्यात येत आहे की, मध्यवर्ती मंडळाची त्रैवार्षिक निवडणूक **रविवार, दिनांक १४ जुलै २०२४ रोजी** कार्यकारी मंडळाने संमत केलेल्या व धर्मादाय आयुक्तांनी मंजूर केलेल्या नियमावलीप्रमाणे "अध्यक्ष" व "कार्यकारी परिषद" यांच्या निवडणूका घेण्यात येतील. घटनेनुसार कार्यकारी मंडळाचे एक अध्यक्ष व ३१ सदस्य असे एकूण ३२ सदस्य असतील. या निवडणूका त्रैवार्षिक असून, वरील जागांचे तपशील पुढीलप्रमाणे :

**कार्यकारी मंडळ सदस्य**

१ अध्यक्ष + ३१ सदस्य = एकूण ३२

| **क्र.** | **विभाग क्षेत्र** | **विभागाचे क्षेत्र** | **कार्यकारी मंडळ : एकूण सदस्य ३१ (म-महिला)** |
|---|---|---|---|
| १. | मुंबई | अ) कुलाबा ते दादर, घाटकोपर<br>ब) बांद्रा ते बोरिवली<br>क) भांडूप, मुलूंड, पवई, चेंबूर, गोवंडी, नवी मुंबई | ४ (म १)<br>३ (म १)<br>१ |
| २. | ठाणे | अ) ठाणे शहर, विरार, वसई, भाईंदर, मिरारोड, बोर्डी, नालासोपारा, डहाणू<br>ब) कल्याण, अंबरनाथ, बदलापूर, पनवेल, रायगड, रत्नागिरी<br>क) डोंबिवली शहर | १<br>१<br>१ |
| ३. | पुणे | अ) पुणे शहर<br>ब) पुणे, कोथरुड<br>क) कोल्हापूर, गडहिंग्लज, सांगली, सातारा, कऱ्हाड<br>ड) सोलापूर शहर, सोलापूर परिसर | ४ (म १)<br>१<br>३<br>२ |
| ४. | उत्तर महाराष्ट्र | अ) नाशिक शहर व नाशिक परिसर<br>ब) अहमदनगर, धुळे, जळगाव, भुसावळ | १<br>१ |
| ५. | मराठवाडा | नांदेड, लातूर, औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद | २ |
| ६. | कर्नाटक | बेळगाव, धारवाड, गोकाक, बंगलोर, विजापूर | ३ (म १) |
| ७. | विदर्भ | नागपूर, अकोला, यवतमाळ, अमरावती, बुलढाणा, चंद्रपूर, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, गोवा, छत्तीसगड, तामीळनाडू, नवी दिल्ली | १<br>(पोस्ट) |
| ८. | आंध्रप्रदेश | हैदराबाद, निझामाबाद, आंध्रप्रदेश | १ (पोस्ट) |
| ९. | गुजरात | अहमदाबाद, बडोदे, सुरत | १ (पोस्ट) |
| | | **एकूण** | **३१** |

अध्यक्षांची निवडणूक सर्व मतदार प्रत्यक्ष मतदान पद्धतीने करतील.

वरील कार्यकारी मंडळ यांची सदस्य संख्या त्या त्या विभागातील पटावर असलेल्या सभासदांची संख्या विचारांत घेऊन घटनेनुसार केली आहे. कार्यकारी मंडळाची मुदत ही निवडणूकीच्या तारखेपासून तीन वर्षांकरिता राहिल. धर्मादाय आयुक्तांनी नेमलेले विश्वस्त या निवडणूकीच्या दिवशी निवृत्त होत असून ते पुनः निवडणूक लढविण्यास पात्र आहेत. नवीन घटनेनुसार पुढील निवडणूकीपासून कार्यकारी मंडळातील सदस्य सलग ६ वर्षांपेक्षा जास्त कालावधीसाठी असणार नाहीत.

१. कोणत्याही सर्वसाधारण सभासदास "कार्यकारी मंडळ" एकाच जागेसाठी अर्ज करता येईल.

२. कार्यकारी मंडळाच्या निवडणूका रविवार दिनांक १४.०७.२०२४ रोजी घेण्यात येईल व वरील विभागात राहणारे मध्यवर्ती मंडळाचे सभासद त्यांच्या निर्धारीत मतदान केंद्रांवर जाऊन मतदान करतील. मतदान केंद्रांची यादी व मतदारांच्या याद्या मतदान केंद्रांवर उपलब्ध होतील.

३. मतदानास येताना सभासदांनी कृपया आपले फोटो ओळखपत्र जसे आधार कार्ड, ड्रायव्हींग लायसन्स, बँक पास बुक इ. जवळ ठेवणे आवश्यक आहे.

४. निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर झाल्यानंतर उमेदवारीचे छापील निवडणूक अर्ज मंडळाच्या कार्यालयातून / संलग्न संस्था कार्यालयातून उमेदवारास किंवा त्यांचे प्रतिनिधीस उपलब्ध होतील. उमेदवारी अर्ज सादर करताना रु. १५००/- (रुपये एक हजार पाचशे फक्त) अनामत रक्कम भरावी लागेल.

५. उमेदवारीची अनामत रक्कम रु. १५००/- (रुपये पंधराशे फक्त) मध्यवर्ति मंडळाच्या नावे (बँक खाते, डि.डि,. पे ऑर्डर) द्वारे भरावेत. त्याचा तपशील उमेदवारी अर्जात नमूद करावा.

६. निवडणूक कार्यक्रमानुसार मुदतीत उमेदवाराने किंवा त्यांचे प्रतिनिधींनी उमेदवारी अर्ज मंडळाच्या कार्यालयात / संलग्न संस्था कार्यालयात निवडणूक अधिकाऱ्यास द्यावा.

७. निवडणूक कार्यक्रमानुसार ज्या उमेदवाराने अर्ज मागे घेतला असेल त्यास अनामत रक्कम परत दिली जाईल. निवडणूकीचे निर्णय जाहीर झाल्यावर एकूण मतदानाच्या १० टक्के पेक्षा कमी मतदान झालेल्या उमेदवाराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. १० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झालेल्या उमेदवाराची अनामत रक्कम उमेदवारास परत केली जाईल. उमेदवाराने अनामत रक्कम १ महिन्याच्या आत परत न नेल्यास ती रक्कम मंडळाकडे जमा होईल.

८. सर्व विभागातून निवडणूकीचा निकाल आल्यावर प्रमुख निवडणूक अधिकारी ते एकत्रित करून निर्णय जाहीर करतील.

सर्व मतदान केंद्रावर प्रत्यक्ष मतदानासंबंधीची प्रक्रिया तसेच पोस्टाने घ्यावयाच्या मतदानासंबंधीचे वेळापत्रक निवडणूकीच्या कामाच्या वेळापत्रकात समाविष्ट केले आहे याची नोंद घ्यावी.

क्रमांक ७, ८, ९ विभागातील मतदारांना पोस्टाने मतदान करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तपशीलासाठी कृपया निवडणूकीच्या कामाचे वेळापत्रक पहावे.

उमेदवारी अर्ज संलग्न संस्थांना पाठविण्यात येत आहे.. मध्यवर्ती मंडळाच्या सभासदासच निवडणूक नियमावलीप्रमाणे निवडणूकीस उमेदवार अर्ज करता येईल. मतदारांची अंतीम यादी मध्यवर्ती मंडळाच्या नोटीस बोर्डवर व संकेत स्थळावर प्रसिद्ध केली जाईल.

सर्वसाधारण सभेची सूचना, कार्यकारी अहवाल, विषय पत्रिका, आर्थिक ताळेबंद अहवाल वगैरे आवश्यक ती कागदपत्रे स्वतंत्रपणे पाठविण्यात येतील.

वरील मतदान प्रक्रिया सभासदांनी त्यांच्या अर्जावर नमूद केलेल्या पत्त्याचा विचार करून ठरविण्यात आलेली आहे.

काही अपरिहार्य कारणास्तव मतदान केंद्र बदलण्याचा वा रद्द करण्याचा अधिकार मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्याकडे राहील.

निवडणूकीच्या संदर्भात कोणत्याही वादग्रस्त विषयावर मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम राहील.

आपला विश्वासू,

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष
(कार्यकारी मंडळाच्या निर्णयानुसार)

**मा. ॲड्. राजेश मुधोळकर**
मुख्य निवडणूक अधिकारी
(कार्यकारी मंडळाच्या निर्णयानुसार)